# अण्णासाहेब पाटील
# आर्थिक मागास विकास महामंडळ

महाराष्ट्र शासनाचा उपक्रम

## महामंडळाच्या योजनांचे माहिती पत्रक

A.N. GROUP
LET'S SUCCEED TOGETHER

## अनंता नाईकनवरे & कंपनी

१०४, दुसरा मजला, देवकते हॉस्पिटल समोर, भक्ती मार्ग,
पंढरपूर - ४१३३०४ 9404039454

लाभार्थी बंधु/भगिनींनो,

वर्षानुवर्षे अन्यायाच्या खाईत तडफडणाऱ्या कष्टकरी कामगारांना मायेचा हात देऊन कै. आमदार अण्णासाहेब पाटील यांनी कष्टकरी माथाडी कामगारांची ऐतिहासिक चळवळ उभी केली. नोकरीविषयक संरक्षण मिळण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडून **"माथाडी ॲक्ट, १९६९ "** हा कायदा व त्यान्वये माथाडी मंडळाच्या स्थापना केली, कामाचे योग्य दाम व इतर सोयी-सवलती मिळवून देऊन कष्टकरी माथाडी कामगार व त्यांच्या कुटुंबियांच्या जीवनाला स्थैर्य प्राप्त करुन देण्याचे महान कार्य **कै. आमदार अण्णासाहेब पाटील** यांनी केले.

अखिल भारतीय मराठा महासंघाच्या वाढीसाठी कै. आमदार अण्णासाहेब पाटील यांनी केलेले कार्य अविस्मरणीय होते, अवघ्या दीड-दोन वर्षाच्या कालावधीत त्यांनी या संघटनेचा संपुर्ण महाराष्ट्रभर विस्तार घडवून आणला व संघटनेला लोकप्रियतेच्या शिखरावर नेऊन ठेवले.

**मराठा समाजाला आर्थिक निकषावर आरक्षण मिळावे, मराठा समाजाला न्याय मिळावा म्हणून दि. २२ मार्च, १९८२ रोजी कै. आमदार अण्णासाहेब पाटील यांनी विधानभवनावर विशाल मोर्चा काढण्याचे नियोजन केले मुंबईतील विशाल मोर्चासमोर बोलताना त्यांनी मराठा समाजाला न्याय मिळाला पाहिजे व मराठा महासंघाच्या न्याय्य मागण्या मान्य झाल्या पाहिजेत, अन्यथा हा अण्णासाहेब पाटील आत्मदहन करेल, अशी घोषणा केली होती त्याच्या दुसऱ्याच दिवशी म्हणजे दि. २३ मार्च, १९८२ रोजी अण्णासाहेबांनी मोठ्या दिमाखाने मृत्यूला मिठी मारली.** कै. आमदार अण्णासाहेब पाटील यांनी मराठा समाजाला आरक्षण मिळण्याची मागणी शासनाने मंजूर केली नाही. त्यामुळे आपल्या प्राणाचे बलिदान दिले त्यांच्या निधनामुळे माथाडी कामगार व मराठा समाज पोरका झाला.

कै. आमदार अण्णासाहेब पाटील यांचे व हिंदु-हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे मैत्रीचे संबंध होते माथाडी कामगार चळवळ आणि मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी त्यांनी जो लढा उभा केला, त्यास त्यांनी मोलाची साथ दिली होती. "अरे अण्णा आयुष्यभर ओझं वाहिलं पण भार कधी वाटला नाही, पण तुझ्या मृत्यूचं हे ओझं नाहीरे सहन होणार " अशी मार्मिकच्या मुख्य पृष्ठावर व्यंगचित्राव्दारे अण्णासाहेबांना बाळासाहेब ठाकरे यांनी श्रध्दांजली वाहिली.

राज्यात सन १९९४ मध्ये युती सरकार आले, त्यावेळी अखिल भारतीय मराठा महासंघाचे अध्यक्ष श्री. किसनराव वरखिंडे यांनी कै. आमदार अण्णासाहेब पाटील यांच्या नावाने महामंडळ व्हावे, अशी मागणी तत्कालीन राज्य शासनाकडे केली होती. या मागणीची दखल घेऊन तत्कालिन **मुख्यमंत्री मा. मनोहर जोशी व उपमुख्यमंत्री स्व. गोपीनाथ मुंडे यांचेकडे बाळासाहेब ठाकरे** यांनी माथाडी कामगार आणि मराठा समाजासाठी अखेरपर्यंत लढा देणारे कै. आमदार अण्णासाहेब पाटील यांच्या नांवाने महामंडळ स्थापन करण्याची शिफारस केली. त्यानुसार तत्कालीन सरकारने रोजगार व स्वयंरोजगार विभाग शासन निर्णय क्रमांक अमामं १९९८/ प्र.क्र.३६३/रोस्वरो-१, दि. २७ नोव्हेंबर, १९९८ व्दारे **अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची** स्थापना केली. राज्यात आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या घटकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे, या समाजाचा सामाजिक विकास करणे, विशेष करुन या समाजातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांकरीता रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याकरीता आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या विकासासाठी महामंडळ स्थापनेचा निर्णय सरकारने घेतला, युती सरकारने हा निर्णय अत्यंत गौरवास्पद घेतला.

तत्कालिन **मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीससाहेब** यांनी सन २०१८ मध्ये अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ पुनर्रजिवीत केले, मराठा समाजातील युवकांना उद्योजक करण्यासाठी या मंडळामार्फत विविध योजना जाहिर केल्या. महामंडळाकरीता शासनाने जाहिर केलेल्या विविध योजनांची अंमलबजावणी होण्याकरीता **कै. आमदार अण्णासाहेब पाटील यांचे सुपुत्र मा. नरेंद्र अण्णासाहेब पाटील** यांची महामंडळाच्या अध्यक्ष पदी नेमणुक केली, या पदाला कॅबिनेट मंत्री पदाचा दर्जा दिला.

**मा. नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांनी अध्यक्ष पदी नेमणुक झाल्यानंतर महाराष्ट्रतील विविध जिल्हे व तालुक्यांमध्ये दौरे करुन अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजनांचा मराठा समाजातील युवकांना लाभ मिळवून देऊन अंदाजे ५० हजार पेक्षा जास्त युवकांना उद्योजक केले.**

मध्यंतरी राज्य सरकारमध्ये बदल झाल्यामुळे अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे संचालक मंडळ रद्द केली, मात्र राज्यात हिंदुत्ववादी सरकारची स्थापना झाल्यानंतर दि. २५ सप्टेंबर २०२२ रोजी स्व. आमदार अण्णासाहेब पाटील यांच्या ८९ व्या जयंतीनिमित्त आयोजित नवीमुंबईतील मेळाव्यामध्ये महाराष्ट्राचे **मुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदेसाहेब व उपमुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीससाहेब** यांनी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या अध्यक्ष पदी अत्यंत कुशलतेने काम केलेले मा.नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांची फेरनिवड करण्याची घोषणा करून शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या शासन निर्णय क्रमांक अपाम-२०१७/प्र.क्र.९०/रोस्वरो-१, दि. ०४ सप्टेंबर, २०२२ व्दारे अध्यक्ष पदाची निवड केली व या पदाला मंत्री दर्जा दिला.

**अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या अध्यक्ष पदी नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांची निवड झाल्यानंतर लगेचच त्यांनी जिल्हा व तालुक्याचे दौरे करुन एक लाख युवकांना उद्योजक करण्याचा मानस त्यांनी केला आहे.**

# महामंडळाच्या योजनांची माहिती

महामंडळाच्या योजनांची संपूर्ण यंत्रणा व कार्यपध्दती ही ऑनलाईन असून पूर्णपणे पारदर्शक आहे. सदर योजना ही लाभार्थीभिमुख असून लाभार्थी जोपर्यंत सर्व माहिती वेब प्रणालीवर (www.udyog.mahaswayam. gov.in.) अपलोड करीत नाही, तोपर्यंत पुढील कार्यवाही करता येत नाही.

## महामंडळाच्या योजनांकरीता सामाईक अटी व शर्ती

१. उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी असणे अनिवार्य.

२. या योजना प्रामुख्याने मराठा प्रवर्गाकरीता तथा ज्या प्रवर्गाकरीता स्वतंत्र महामंडळ अस्तित्त्वात नाही, अशांकरीता आहेत.

३. **योजनेकरीताची वयोमर्यादेची अट स्त्री-पुरुषांकरीता कमाल ६० वर्षे असेल.**

४. लाभार्थ्याचे कौंटूबिक वार्षिक उत्पन्न रु. ८ लाखाच्या आत असावे. (जे रु. ८ लाखाच्या मर्यादेत असल्याचे तहसिलदाराचे प्रमाणपत्र) किंवा वैयक्तीक I.T.R. (पती व पत्नीचे)

५. लाभार्थ्यांने महाराष्ट्राच्या भौगोलिक क्षेत्रात स्थायिक / कार्यरत असलेल्या बँकेकडून कर्ज घेणे अनिवार्य असेल.

६. दिव्यांग व्यक्तीला योजनेअंतर्गत लाभ घ्यावयाचा असल्यास तो मानसिक दृष्ट्या सक्षम असावा.

७. गट कर्ज व्याज परतावा योजना (IR-II) मध्ये कमाल वयोमर्यादेचे बंधन नसेल.

८. गट कर्ज व्याज परतावा योजना (IR-II) अंतर्गत (i) भागीदारी संस्था (ii)सहकारी संस्था (iii) बचत गट, (iv) एल.एल.पी. (v) कंपनी कायद्याअंतर्गत नोंदणीकृत संस्था व इतर शासन नोंदणीकृत गट / संस्था लाभास पात्र असतील.

९. महामंडळाच्या योजनांतर्गत फक्त व्यवसाय/ उद्योगाकरीता घेतलेल्या कर्जावरील व्याज परतावा करण्यात येईल व या योजनांची अंमलबजावणी तंतोतंत शासन निर्णय क्र. अपाम २०१७/प्र.क्र.१८७/रोस्वरो-१, दिनांक २१ नोव्हेंबर, २०१७ नुसार करण्यात येईल.

## महामंडळाच्या योजनांची माहिती

### वैयक्तीक कर्ज व्याज परतावा योजना (IR-1)

या योजनेची मर्यादा रु. १० लाखाहून रु. १५ लाखापर्यत वाढविण्यात आलेली असून, महामंडळामार्फत रु. ४.५ लाखाच्या व्याज मर्यादेत परतावा करण्यात येईल. सदर व्याज परतावा कालावधी जास्तीत-जास्त ७ वर्ष व व्याजाचा दर जास्तीत-जास्त द.सा.द.शे. १२% असेल. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांनी मात्र बँकेमार्फत कर्ज घेतलेले असावे व ते फक्त व्यवसायिक तथा उद्योगाच्या दृष्टीने मंजूर झालेले असावे.



(टिप : मात्र दिनांक २० मे, २०२२ पूर्वीच्या L.O.I. धारकांना नियमानुसार रु. १० लाखाच्या मर्यादेतील व्याज परतावा करण्यात येणार असून त्याकरीता रु. ३ लाखाची मर्यादा असेल.)

### गट प्रकल्प कर्ज व्याज परतावा योजना (IR-2)

या योजनेअंतर्गत किमान दोन किंवा दोन पेक्षा अधिक व्यक्तींच्या गटाने एकत्र येऊन,

- दोन व्यक्तींसाठी कमाल रु. २५ लाखाच्या मर्यादेवर,
- तीन व्यक्तींसाठी रु. ३५ लाखाच्या मर्यादेवर,
- चार व्यक्तींसाठी रु. ४५ लाखाच्या मर्यादेवर व



- पाच व पाच पेक्षा अधिक व्यक्ती असल्यास रु. ५० लाखापर्यतच्या व्यवसाय/ उद्योग कर्जावर ५ वर्षापर्यत अथवा कर्ज कालावधी यापैकी जे कमी असेल ते, जास्तीत जास्त १२ टक्के व्याज किंवा रु. १५ लाखाच्या मर्यादेत कर्ज मंजूर केलेल्या गटाने वेळेत कर्जाचे हफ्ते भरल्यास, हफ्ता भरल्यावर त्यातील व्याजाची रक्कम गटाच्या बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येईल.
- या योजनेमध्ये FPO गटांनी त्यांच्या शेतीपूरक व्यवसायाकरीता बँकेमार्फत घेतलेल्या कर्जावरील देखील व्याज परतावा नियमानुसार महामंडळ करेल.

**या योजनांचा लाभ घेण्यासाठी खालील कार्यपध्दती अत्यंत महत्वाची असून याच पध्दतीचा अवलंब करावा.**

(अ) **पात्रता प्रमाणपत्र (LOI) करीता महत्वाची कागदपत्रे :**

- **आधार कार्ड :** (अपडेटेड मोबाईल क्रमांक व स्वतःच्या ई–मेल आयडी सह)
- **रहिवासी पुरावा :** ( रहिवासी दाखला / लाईट बिल / रेशनकार्ड / गॅस बिल / बँक पास बुक)
- **उत्पन्नाचा पुरावा :** ( उत्पन्नाचा दाखला / आयटी रिटर्न (जर लग्न झाले असल्यास नवरा–बायकोचे व लग्न झाले नसल्यास स्वतःचे आयटी रिटर्न अनिवार्य)
- **जातीचा दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला**
- **एक पानी प्रकल्प अहवाल.** (याचा नमुना वेब प्रणालीवर उपलब्ध आहे.)

(ब) पात्रता प्रमाणपत्र (LOI) प्राप्त झाल्यानंतरच, LOI समवेत लाभार्थ्यांने त्याला करावयाचा असलेल्या व्यवसायाचा / उद्योगाचा प्रकल्प अहवाल (आवश्यक ते सर्व कागदपत्र) घेऊन त्यांच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही बँकेमध्ये कर्ज प्रकरण दाखल करावे. कर्ज मंजूरीची पुर्ण प्रक्रीया बँक त्यांच्या नियमानुसार करीत असते, यामध्ये महामंडळ कोणत्याही स्वरुपाचा हस्तक्षेप करीत नाही. कर्ज प्रकरण दाखल केल्यानंतर पोचपावती बॅकेकडून घ्यावी.

(क) बँकेने कर्ज मंजुर केल्यानंतर कर्ज मंजूरीबाबतची आवश्यक सर्व माहिती संबंधिताने वेब प्रणालीवर सादर करावी.
(उदा. ज्या खात्यामध्ये व्याज परतावा हवा आहे त्याचा तपशील, बँक कर्ज मंजुरी पत्र, बँकेमार्फत वितरीत करण्यात आलेल्या कर्जाचा पुरावा (बँक स्टेटमेंट), बँक EMI वेळापत्रक (त्यावर वसुलीचा दिनांक असणे अनिवार्य), प्रकल्प अहवाल, हफ्ता भरल्याबाबतचा पुरावा (बँक स्टेटमेंट सही व शिक्क्यानिशी)

(ड) त्यानंतर बँकेमध्ये पुर्ण EMI हफ्ता विहित कालमर्यादेत भरल्यानंतरच महामंडळाच्या वेब प्रणालीवर ऑनलाईन क्लेम दाखल करावा. दाखल केलेला क्लेम अचूक असला तरच संबंधिताला व्याज परताव्याचा लाभ देता येईल. यामध्ये हफ्ता भरल्याबाबतचा पुरावा म्हणून बँक स्टेटमेंट सही व शिक्क्यानिशी अपलोड करणे अनिवार्य असेल.

(इ) लाभार्थ्याने दाखल केलेल्या क्लेमची पडताळणी महामंडळामार्फत करण्यात येऊन, लाभार्थ्यांस अनुज्ञेय असलेली व्याज परताव्याची रक्कम संबंधिताच्या बँक खात्यात ऑनलाईन स्वरुपात वितरीत करण्यात येईल.

**या योजनांच्या लाभाकरीता कोणत्याही सहकार्याची आवश्यकता असल्यास महामंडळाच्या जिल्हा समन्वयकांना संपर्क साधावा. जिल्हा समन्वयकांचा संपर्क वेब प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यात आला आहे.**

## सिबिल (CIBIL) बद्दल माहिती

**सिबिल स्कोअर बँकिंग किंवा वित्तीय संस्थांमध्ये खूपच महत्वाचा मानला जातो. सिबिल स्कोअर हा तुमच्या क्रेडिट हिस्ट्री दर्शवतो आणि याच स्कोअरच्या आधारावर तुम्हाला कर्ज किंवा क्रेडिट कार्ड देण्यात येते.**

### जाणून घ्या सिबिल स्कोअर म्हणजे नेमके काय ?

सिबिल स्कोअर हा ३०० ते ९०० च्या दरम्यान गणला जातो. ३०० हा सर्वात कमी तर ९०० हा सर्वात चांगला सिबिल स्कोअर असल्याचं दर्शवतो. तुम्ही कर्जाची (Loan) परतफेड किंवा क्रेडिट कार्ड (Credit Card) पेमेंट योग्य वेळेत केले पाहिजे.. बँकिंग किंवा वित्तीय संस्थांमध्ये सिबिल स्कोअरला खूपच महत्व आहे. तुम्हाला गृह कर्ज, वाहन कर्ज, वैयक्तिक कर्ज, क्रेडिट कार्ड घ्यायचे असल्यास बँकांकडून सिबिल स्कोअर तपासला जातो.

### ७५० किंवा त्यापेक्षा अधिक सिबिल स्कोअर चांगला मानला जातो

७५० इतका सिबिल स्कोअर हा चांगला असल्याचं मानलं जातो. जर आपला सिबिल स्कोअर ७५० पेक्षा कमी असेल तर आपल्याला बँका किंवा एनबीएफसी यांच्याकडून कर्ज घेण्यास अडचणी येतात.

### सिबिल स्कोअर वाढवण्यासाठी काय करावे ?

जर तुम्ही एखादं कर्ज घेतलं असेल किंवा क्रेडिट कार्डचा वापर केला असेल तर त्याचा हफ्ता वेळेवर भरा. वेळेवर हफ्ता भरल्यास तुमचा सिबिल स्कोअर सुधारण्यास मदत होते.

### सिबिल स्कोअर सुधारण्यासाठी काही टिप्स :

१. आपल्या सिबिल स्कोअरचे परीक्षण करा: सिबिल स्कोअर हा चांगला असल्यास तुम्हाला आवश्यक असलेले कर्ज मंजुर होण्यास मदत होते.
२. **मर्यादित वापर:** आपल्या क्रेडिट मर्यादेपेक्षा जास्त खर्च करु नये आणि त्याची खात्री करुन घ्यावी. जर तुम्हाला सिबिल स्कोअर ७५० पर्यंत ठेवायचा असेल तर आपल्या क्रेडिट मर्यादेच्या ५० टयांहून अधिक खर्च करणे टाळा.
३. **वेळेवर देयके:** चांगला सिबिल स्कोअर ठेवण्यासाठी वेळेवर कर्जाचे किंवा क्रेडिट कार्डचे हफ्ते भरा. उशीरा पेमेंट टाळा. अन्यथा त्याचा परिणाम तुमच्या सिबिल स्कोअरवर होतो


# अनंता नाईकनवरे & कंपनी

१०४, दुसरा मजला, देवकते हॉस्पिटल समोर, भक्ती मार्ग, पंढरपूर – ४१३३०४

9404039454, 7020167328 ananta.naiknaware1@gmail.com https://anantanaiknawaretax.com/